# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

---

**दिनांक २८.०९.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २७.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ०५ केसेसमध्ये ०६ ईसमावर कारवाई करून एकुण १,५७,११०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. जुगार कायदा अन्वये ०१ केसमध्ये ०१ इसमावर कारवाई करून एकुण २,६६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दिनांक २७.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २८.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०१ इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ओव्हरस्पीड वाहन चालविणे कलम १८४ मोवाका २८ केस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये २५ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये ३४ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये ९८ केसेस, रॉंग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये २९ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४(ए) मोवाका अन्वये २६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ७२ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०५ केसेस, विदाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये ३० केसेस, विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १००२ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ११ केस, ड्रंक ॲन्ड ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये ०५ केसेस व इतर कलमांखालील वेगवेगळे गुन्हे असे एकुण १,४०९ वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. २,१६,८५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

२) **एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या ईसमाविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.०९.२०२६ चे रात्रगस्त दरम्यान, एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे लकडगंज हद्दीत, सतनामी नगर येथील हिरा पान पॅलेस येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली. पान पॅलेस येथे हजर असलेल्या ईसमास त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव बादल मोतिलाल काटोके वय २५ वर्षे, रा. भरतवाडा, पुनापुर, पारडी, नागपुर असे सांगीतले. पान टपरीची पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे शासनाने प्रतिबंधीत केलेला तंबाखुजन्य पदार्थ गुटखा, सुगंधीत पानमसाला ज्यामध्ये विमल, राजश्री, पानपराग, बाबा नवरतन, रजनीगंधा इत्यादी कंपनीचे वेगवेगळे लहान मोठे पाऊच व डब्बे तसेच प्रतिबंधीत सिगारेट इत्यादी मुद्देमाल मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन रोख १६,६३०/— रुपये व तंबाखुजन्य पदार्थ असा एकुण ९५,७७६/—रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त

करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता शासन प्रतिबंधीत तंबाखुजन्य पदार्थ बेकायदेशीर विक्री करीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. पानटपरी चालकाविरूध्द अन्न व औषध प्रशासन अधिकारी यांचे तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात येत आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव लकडगंज पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे.

वरील कामगिरी मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात सपोनि. भगवान कोळी, मपोउपनि. सोनल शिंदे, पोहवा. अनुप लोलुसरे, पोअं. आशिष गायधने, दिनेश क्षीरसागर, अर्शद शेख, सोनु सोनवणे, चंद्रकांत मेहेत्रे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे बजाजनगर :— हद्‌पार ईसमास अटक.</u>**

दिनांक २८.०९.२०२६ चे ००.३० वा. चे सुमारास, बजाजनगर पोलीसांचे तपास पथक हे पेट्रोलींग करीत असता, पोलीस ठाणे हद्दीत श्रध्दानंद चौक येथे एक इसम संशयीतरित्या फिरतांना दिसुन आल्याने, त्याचेजवळ जात असतांना, तो पळु लागल्याने त्याचा पाठलाग करून, त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव कमल महेश डकाहा वय ३८ वर्षे, रा. स्वीपर कॉलनी, लक्ष्मीनगर पाण्याचे टाकीजवळ, बजाजनगर नागपूर असे सांगीतले. पोलीस ठाणे येथे आणुन त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ३७३६/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बजाजनगर येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे खापरखेडा :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २६.०९.२०२६ चे २१.१५ वा. चे सुमारास, फिर्यादीचे आतेभाऊ नामे ईश्वर तुळशीराम कुकडकर वय ५५ वर्ष रा. वार्ड क्र. २, पाटणसांवगी, जि. नागपूर हे त्यांचे सुझुकी मोपेड क्र. एमएच ३१ डीएन ३५४० ने पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीतील दहेगाव ते खापरखेडा रोड दरम्यान सब्बल नाल्याजवळील हनुमान मंदीरासमोरुन जात असता, अशोक लेलॅन्ड वाहन क्र. एमएच ४० बीजी ७८३१ चा चालक नामे चंदन सुरेश जैस्वाल वय ३५ वर्ष रा. अमरनगर, एमआयडीसी, नागपूर याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे आतेभाऊचे दुचाकीस जोरदार धडक दिल्याने ते दुचाकीसह खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी वसंता सदाशिव घोटेकर वय ४६ वर्ष रा. वार्ड क्र. २, नवीन बिना, भानेगाव, खापरखेडा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे पोउपनि. अविनाश निकाळजे

८८८८०५६८५० यांनी आरोपी वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २६.०९.२०२६ चे १५.०० वा. ते दिनांक २७.०९.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत, प्लॉट क्र. ८०, महालक्ष्मी नगर—२, मानेवाडा रोड, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी श्रीमती ममता विनोद पारखी वय ५२ वर्षे हया आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह गणपती कार्यक्रमाकरीता आईचे घरी गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कडी कोंडा व कुलुप तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १,५०,०००/—रू. व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती १०,१५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

यापकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे पोउपनि. शलाका शिरसाठ ७३९१००९९९१ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे हिंगणा :—** दिनांक २७.०९.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, आंबेडकर चौक येथील संत रविदास पुतळयाजवळ एक अनोळखी पुरूष इसम वय अंदाजे ५५ ते ६० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, पोलीसांनी त्यांना उपचाराकरीता ग्रामिण रुग्णालय हिंगणा येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे उजवे हातावर 'बाबाराव' असे नाव गोंदलेले आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे हिंगणा येथे संपर्क साधावा.

यापकरणी फिर्यादी प्रशांत बाळेश्वर समर्थ वय ४७ वर्षे रा. रामपुरा, हिंगणा, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे अकस्मात मृत्यूची नोंद घेतली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. ८ वे प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ९१२/२०१० | कलम २९४ भा.दं.वि. | सुरेश पांडुरंग निखारे रा. बांग्लादेस, दत्त मंदीरजवळ, शाहुचे घरी किरायाने, पाचपावली, नागपुर. | २९.०९.२०२६ |

स्वा/—

( अंकुश राठोड )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.